संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत पीएच.डी. (भूगोल) विषयासाठी करावयाचा शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधनाचा विषय

“मुखेड तालुक्यातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास ”

संशोधक

बोधले कविता केरबा

(एम.ए., बी.एड् नेट, भूगोल)

मार्गदर्शक

›Ö. ŸÖÖ»Ö´ÖÖ¸ü ‹ÃÖ.‹ÃÖ.

(‹´Ö.‹., ²ÖÎ.‹›ü,‹´Ö.×±ú»Ö, ¯ÖÎ‹“Ö.›üß.)

भूगोल विभाग प्रमुख

स्वामी योगानंद महाविद्यालय, वसमत

जि. परभणी.

“मुखेड तालुक्यातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास ”

प्रस्तावना :

कोणत्याही देशाची लोकसंख्या हा नेहमी प्रगमनशील घटक असतो. लोकसंख्या ही सर्वात महत्वाची साधन संपत्ती आहे. मनुष्यबळ विकासासाठी लोकसंख्या शास्त्रीय घटकांची सर्वांगीण आणि सखोल विश्लेषण करण्याची गरज असते. यासाठी लोकसंख्याशास्त्रीय घटकांची सर्व स्तरावरील आकडेवारी प्राप्त करणे आवश्यक असते.

लोकसंख्या म्हणजे कोणत्याही प्रदेशातील लोकांचे वितरण सांख्यिकीय पध्दतीने विश्लेषण करणे होय. एखाद्या प्रदेशाची लोकसंख्या अतिशय कमी किंवा जास्त असणे त्या प्रदेशाचा विकासासाठी उपयुक्त नसते. तर लोकसंख्या मर्यादीत व कार्यशील असल्यास त्या प्रदेशास विकास वेगाने होतो.

लोकसंख्या हा शब्द इ.स. पूर्वी 321 ते 269 या काळात आर्य-चाणक्याच्या कौटीलीय अर्थशास्त्र या ग्रंथात वापरला असून यात लोकसंख्येची आर्थिक आणि शेतीसंबंधात मोजणी कशी करावी याचे विश्लेषण केले आहे. सतराव्या शतकात इंग्लंडमधील स्त्री-पुरुष मृत्यू दराची निश्चिती करण्यासाठी जॉन ग्रॉट (1620 ते 1674) यांनी लोकसंख्याचे निष्कर्ष काढले. त्यामुळे त्यांना आधुनिक लोकसंख्या शास्त्र अभ्यासाचा जनक असे म्हणतात.

सतराव्या शतकापासुन लोकसंख्येच्या शास्त्रीय अभ्यासाला सुरुवात झाली. लोकसंख्या भूगोलाचा विकास अलीकडच्या काळात झाला असला तरी लोकसंख्या संबंधीचा अभ्यास प्राचीन काळापासून चालू आहे. लोकंसख्या भूगोल शाखेत लोकसंख्या घटकांचा अभ्यास केला जातो.

प्रस्तुत संशोधनामध्ये नांदेड जिल्हयातील **“मुखेड तालुक्यातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास ”** करत असल्यामुळे या ठिकाणी मुखेड तालुक्यातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास करण्यात येणार आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासात पौराणिक व ऐतिहासिक वारसा लाभलेला महत्वाचा जिल्हा म्हणून नांदेड जिल्हा ओळखला जातो. शिखांचे दहावे गुरु गोविंदसिंगजी यांच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झालेली ही भूमी तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते. नांदेड जिल्हा मध्यवर्ती क्षेत्र असल्यामुळे त्यास गोदावरी नदीचे नाभीस्तान म्हटले जाते. रामायन, महाभारत यासारख्या प्राचीन धर्मग्रंथात नांदेडचा उल्लेख आढळतो.

प्रस्तुत संशोधनामध्ये महाराष्ट्र राज्यातील पश्चिम महाराष्ट्र, कोकण, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या प्रदेशापैकी मराठवाडा प्रांतातील नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्याच्या लोकसंख्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. या संशोधनामध्ये प्रामुख्याने मुखेड तालुक्याची लोकसंख्या, लोकसंख्येची घनता, लोकसंख्येचे प्रमाण, लोकसंख्याप्रमाण, स्त्री-पुरुष प्रमाण, लोकसंख्येची वाढ, लिंगगुणोत्तर साक्षरतेचे प्रमाण इत्यादींचा काळानुसार होणार बदल व प्रादेशिक वितरणाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

मुखेड तालुक्याची लोकसंख्या :

सन 2001 च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्ह्याची लोकसंख्या 28,76,259 ती महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या 2.96 टक्के आहे. नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्याची लोकसंख्या 2,43,030 एवढी आहे.

मुखेड तालुक्याचे स्थान व विस्तार :-

नांदेड जिल्ह्याचे स्थान भौगोलिक दृष्ट्या मराठवाड्याच्या पूर्वेस असून महाराष्ट्र राज्याच्या आग्नेय दिशेस आहे. हा जिल्हा दख्खनच्या पठारावर गोदावरीच्या पात्रात वसलेला आहे. नांदेड जिल्ह्याची निर्मिती 1 मे 1962 रोजी झाली असून जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ 10,528 चौ. कि.मी. आहे. मुखेड तालुक्याचे भौगोलिक क्षेत्रफळ 1,067.1 एवढे असून आकारमानानुसार क्षेत्रफळ हदगांव तालुक्याच्या खालोखाल †ÖÆê.

मुखेड तालुक्याचा विस्तार 18^{0}. 20’ ^¢Ö¸ü 77^{0}. 15’ ¯Ö¾Ö †ÖÆê. µÖÖ तालुक्याच्या पश्चिमेस कंधार तालुका व लातूर जिल्ह्याचा काही भाग येतो, पूर्वेस देगलूर, उत्तरेस- कंधार व बिलोली तर दक्षिणेस लातूर जिल्हा येतो.

नांदेडच्या दक्षिणेस 85 कि.मी वर वसलेले मुखेड हे शहर तालुका मुख्यालय आहे हा परिसर राष्ट्रकूट- चालुक्य काळात प्रसिध्दीस आला हे शहर मोहनावती नदीच्या काठावर वसलेले आहे. या तालुक्यात बालाघाटाच्या उपरांगा पसरल्या असल्यामुळे हा तालुका डोंगराळ म्हणून ओळखला जातो. मुखेड तालुक्यातील लेंडी, मन्याड या नद्या वाहतात. लेंडी नदी तिची उपनदी तिरु या नदीसह जिल्ह्याच्या दक्षिणेकडील भागात मुखेड तालुक्यातून पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते. लेंडी नदीवर आंध्रप्रदेश व महाराष्ट्र यांच्या भागीदारातून संयुक्त प्रकल्प उभारण्यात आला आहे. त्याची लांबी 1,651.40 मी व उंची 27.83 मी आहे. या प्रकल्पाच्या सहाय्याने मुखेड व देगलूर तालुक्यातील एकूण 15,710 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे उद्दीष्टे होते.

मुखेडच्या पश्चिमेकडील भागात टेकड्यांचे प्रमाण जास्त असल्यामुळे हिरवळ कमी आहे. येथील मृदा काळी असली तरी खडकाळ व कमी जाडीची आहे. मुखेडच्या पूर्वेकडील भागात मृदेची जाडी वाढते येथील मृदा सुपीक आहे. त्यामुळे या भागात खरीप नंतर रबी पीके घेतली जातात. मुखेडजवळ लॅटेराईट प्रकारची मृदा आढळते.

विषय आणि अभ्यास क्षेत्राची निवड :

कोणत्याही राष्ट्रीची संपदा व आर्थिक विकास ज्या घटकांवर अवलंबून असतो त्यामध्ये लोकसंख्या हा पायाभूत घटक आहे. विकासाचा मूलाधार असलेल्या लोकसंख्या वैशिष्ट्यांची माहिती असणे आवश्यक असते. कोणत्याही प्रदेशाचा विकास लोकसंख्येवर अवलंबून असतो. म्हणून मुखेड तालुक्यातील लोकंसख्या वैशिष्ट्यांची माहिती मिळविण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली आहे. संपूर्ण नांदेड जिल्ह्याच्या तुलनेत मुखेड तालुक्याची लोकसंख्येची कशा प्रकारची आहे हे जाणुन घेण्यासाठी हा

विषय निवडण्यात आला आहे. मुखेड तालुक्यातील लोकसंख्येचे वितरण, लोकसख्येची वाढ, तसेच साक्षरतेचे प्रमाण, त्यांचे विविध क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण लिंगगुणोत्तर, धर्मनिहाय लोकसंख्येचे प्रमाण या सर्व प्रकारच्या लोकसंख्या वैशिष्टयांची माहिती मिळविण्यासाठी हा विषय निवडला आहे.

संशोधनासाठी नांदेड जिल्ह्याच्या दक्षिण दिशेला वसलेल्या मुखेड तालुक्याची निवड करण्यात आली असून, तालुक्यातील लोकसंख्या वैशिष्ट्याचा अभ्यास करण्यासाठीच या विषयाची निवड करण्यात आली आहे. तालुक्याच्या विकासामध्ये संशोधन करुन काही पर्याय सूचविता येतील का ? लोकसंख्येच्या काही समस्या आहेत का ? याची माहिती करुन त्यावर उपाय सुचविता येतील या उद्देशाने या अभ्यास क्षेत्राची निवड करण्यात †Ö»Ößê †ÖÆê.

संशोधनाची उद्दीष्ट्ये :-

प्रस्तुत संशोधनाची खालील प्रमाणे उद्दीष्ट्ये आहेत.

1) मुखेड तालुक्यातील लोकसंख्येच्या वितरणाचा व घनतेचा अभ्यास करणे.
2) मुखेड तालुक्यातील लोकसंख्या वाढीचा दर अभ्यासणे.
3) मुखेड तालुक्यातील लिंगगुणोत्तर व साक्षरतेचा अभ्यास करणे.
4) मुखेड तालुक्यातील ग्रामीण नागरी लोकसंख्या वयोगट व कामगार लोकसंख्येचा अभ्यास करणे.
5) मुखेड तालुक्यातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचे अवलोकन करुन उपाय-योजना सूचविणे.

संशोधनाची गृहितकृत्य :-

प्रस्तुत संशोधनाची गृहीतकृत्य खालील प्रमाणे सांगता येतील.

1) मुखेड तालुक्यातील लोकसंख्येच्या वितरण व घनतेमध्ये विषमता असेल.
2) मुखेड तालुक्यातील लोकसंख्या वाढीचा दर जास्त असेल.
3) मुखेड तालुक्यातील लोकसंख्येचे लिंगगुणोत्तर व साक्षरतेचे प्रमाण कमी असेल.
4) मुखेड तालुक्यातील लोकसंख्येचे प्रमाण ग्रामीण भागात जास्त असेल व कार्यकारी लोकसंख्या प्रमाण कमी असेल.

संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी प्राथमिक व व्दितीय साधनांचा उपयोग करण्यात येईल. लोकसंख्या भूगोलाचा अभ्यास करण्यासाठी लोकसंख्याविषयक सामग्रीची नितांत आवश्यकता असते. प्राथमिक माहिती गोळा करण्यासाठी मुखेड तालुक्यातील जास्तीत जास्त लोकसंख्या असलेल्या गावांची सहेतुक नमुना पध्दतीने निवड करण्यात येईल. प्राथमिक साधनामध्ये सर्व्हेक्षण मुलाखती व प्रश्नावलीचा उपयोग करण्यात येईल.

व्दितीय साधनामध्ये शासकीय विविध अहवाल, जनगणना अहवाल, महाराष्ट्र गॅझीटिअर्स , शासकीय प्रकाशने, इत्यादी दुर्मिळ व मूळ पुस्तकांचा उपयोग विषयाच्या अनुषंगाने विविध मासिके, वृत्तपत्रे व संकेतस्थळे इत्यादी साधनांचा माहिती गोळा करण्यासाठी उपयोग केला जाईल.

संशोधन साहित्याचा आढावा :

प्रस्तुत संशोधन कार्याशी संबंधीत विविध प्रकारच्या पुस्तकाच्या प्रकाशीत व अप्रकाशीत ग्रंथसाहित्याचा व संशोधन अहवालाचा आढावा घेण्यात आला आहे.

1) मुखर्जी ए.बी. (1951) : यांनी उत्तर प्रदेशातील लोकसंख्येच्या पोषण घनतेतील बदल या विषयावर संशोधन केले आहे. त्यांनी या संशोधनाव्दारे उत्तर प्रदेशातील वाढती लोकसंख्या व घटते कृषी क्षेत्र यावर प्रकाश टाकला आहे.

2) क्लार्क जे.वाय (1966) : यांनी आपल्या लोकसंख्या भूगोल या ग्रंथामध्ये लोकसंख्येच्या विविध वैशिष्ट्यावर परिणाम करणाऱ्या विविध घटकांचे भौगोलिक विश्लेषण केले आहे.

3) कौलिया, अरुण (1971) : यांनी राजस्थानच्या लोकसंख्या भूगोल या विषयामध्ये लोकसंख्या वितरण, घनता, वाढ , जन्मदर मृत्यूदर, स्थलांतर, लिंगगणोत्तर साक्षरता, वयोरचना, नागारीकरण अशा लोकसंख्या विषयक घटकांवर भौगोलिक घटकांचा होणाऱ्या परिणामावर अभ्यास केला आहे.

4) दास के.एन. (1973) : यांनी बिहार राज्यातील पीक प्रारुपात होणारा बदलाचा †³µÖÖÃÖ केला. प्रदेशातील लोकसंख्येचा भार पिकामधील उत्पादकतेत वाढ करतो. तसेच लोकसंख्या वाढीमुळे पिकातील वैविद्यता वाढते. असे त्यांनी विश्लेषण केले.

5) रॉय शिला (1972) : यांनी उत्तर प्रदेशातील विविध व्यवसाय करणाऱ्या लोकसंख्यातील बदल या विषयावर संशोधन केले आहे. या संशोधनामध्ये उत्तर प्रदेशातील व्यावसायिक लोकसंख्येचे विविध क्षेत्रात वर्गीकरण काळाच्या ओघात आणि प्रदेशानुसार व्यावसायिक लोकसंख्येत झालेला बदल सविस्तरपणे स्पष्ट केलेला आहे.

6) कोरे एन.एस. (2001) यांनी नांदेड जिल्ह्यातील लोकसंख्येचा भूमी उपयोजनावर पडलेल्या भाराचे विश्लेषण आपल्या संशोधनात केले आहे.

7) वाघमारे एन.के. (2009) यांनी नांदेड जिल्ह्यातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास या विषयावर संशोधन केले असून त्यांच्या मते लोकसंख्या शास्त्रीय घटकांच्या वैशिष्ट्यामध्ये विषमता व तफावत अधिक प्रमाणात आढळून आली असे त्यांच्या निष्कर्षावरुन दिसून येते.

*** प्रकरणाची रुपरेषा :**

1) प्रस्तावना
2) मुखेड तालुक्याची भौगोलिक पार्श्वभूमी
3) मुखेड तालुक्यातील लोकसंख्या वितरण व घनता
4) मुखेड तालुक्यातील लोकंसख्या वाढ.
5) मुखेड तालुक्यातील लोकसंख्येचे स्त्री- पुरुष प्रमाण, लिंग गुणोत्तर व साक्षरता.
6) मुखेड तालुक्यातील ग्रामीण- नागरी लोकसंख्या वयोगट व कामगार लोकसंख्या.
7) निष्कर्ष व उपाययोजना :-

ÃÖ¤³ÖÃÖ“Öß :

1) Ohal, A.G. and Ramotra K.L., 2003.
"Growth of population in south Maharashtra. (India)"
A Geographical Analysis (1981-2011), GRT, Vol.3, Issue 4, Oct. 2013 PPI-6.

2) Ghosh S. (1970), Physical and Economic factors in the population Distribtion of Bihar" The hational Geographical Journal of India 16, 61-70

3) Mishra V.C. & Sharma S.. 1983 Population growth and Agricultural changes in madhy predesh, spatial analysis of their correlates national geography vol. XI III No.2 , P- 139- 141

4) Dhuri S.J. 2012 "Urban Growth and demographic Characterstics" in Sindhudurg District (Maharashtra Submitted to SJPJT University, Rajasthan, July 2012, PPT 4

5) डॉ. कोरे एन.एस., (2001): नांदेड जिल्ह्यातील लोकसंख्येचा भूमी उपयोजनावर पडलेला भार अप्रकाशीत पीएच.डी. शोध प्रबंध, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड

6) डॉ. वाघमारे एन.के. 2009, नांदेड जिल्ह्यातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचा अभ्यास. अप्रकाशीत पीएच.डी. शोध प्रबंध, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड.

7) नांदेड जिल्हा गॅझेटिअर 2011, भाग- 1, भाग-2.

8) लोकसंख्या भूगोल, (डॉ. विठ्ठल घारपूरे)

9) धुरी, निलम 2008, संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

11) सवदी ए.बी. 2012, महाराष्ट्राचा भूगोल, निराली प्रकाशन, पुणे.

10) Census of India (2001) : District Census handbook, Nanded.

संशोधक
बोधले कविता केरबा
(एम.ए., बी.एड् नेट, भूगोल)

मार्गदर्शक
›Öê. ŸÖÖ»ÖÖ´ÖÖ¸ü ‹ÃÖ.‹ÃÖ.
भूगोल विभाग प्रमुख
स्वामी योगानंद महाविद्यालय, वसमत
जि. परभणी.